# प्रभुतरुण

| वर्ष ५० | अंक ९ | मुंबई | मार्च, २०१७ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३)


**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**


**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटचे**


*संपादकीय*

## ‘मूल्यां’कन

—सुहासिनी कीर्तिकर

गेल्या महिन्यात महाशिवरात्र (माही शिवरात्र) झाली. पूर्वी या दिवशी उपास तर असायचाच. पण आठवतेय की श्रावणी सोमवारी आणि शिवरात्रीला शंकराचं महात्म्य ठसावं म्हणून ‘शिवलीलामृत’ही आम्ही वाचायचो. विशेषत: त्यातील ‘अमृत’तुल्य असा महिमा असलेला अध्याय वगैरे. त्यातील काही प्रसंगांनी, महात्म्य सांगणाऱ्या व्यक्तींनी आणि त्यांच्या नैतिकतेच्या वेगळ्या परिमाणांनी भावुक मनावर फार परिणाम व्हायचा. ‘महानंदा’ नामक वेश्या. तिची शिवभक्ती. तिच्याकडे असलेले कुक्कुट-मर्कट. सगळं कसं विलक्षण वाटायचं. विशेषत: महानंदा वेश्येचेही दाखविलेले पतिव्रता म्हणून रूप! ‘वेश्या असूनही पतिव्रता। नेमिला जो पुरुष तत्त्वता। त्याचा दिवस न सरता। इंद्रासही वश नव्हे।।’ हा तिने राखलेला व्यावसायिक, सत्त्वनिष्ठ बाणा! पुढे कवितेचं वेड लागल्यावर ग. दि. माडगूळकरांची ‘जोगिया’ ही कविताही एका वेश्येचे प्रेमभंगाचे रूप पहाताना वेड लावून गेलेली. आठवतायत्; त्या कवितेच्या सुरवातीच्या चित्रदर्शी ओळी. ‘कोन्यात झोपली सतार, सरला रंग,पसरली पैंजणे सैल टाकुनि अंग. दुमडला गालिचा, तक्के झुकले खाली. तबकात राहिले, देठ लवंगा, साली.’ मैफल अशी सुस्तावलेली. का? तर एकदा लाभलेल्या उडत्या प्रेमाच्या आठवणींचा तो दिवस. वेगळाच ‘व्हॅलेंटाईन्स डे!’ त्या दिवशी मग दर वर्षी ही मैफल अशीच पारोशी. त्यांच्या आठवणींनी तिचं मन गुदरमलेलं. ‘इंद्रासही वश नव्हे’ चेच वेगळे रूप. या व्यवसायातही मूल्य जपण्याचा अनोखा अविष्कार.

‘मूल्य जपणे’ म्हणजे काय हो? संस्कृती जपणे. व्यक्तीरूप घडविण्यासाठी, समाजाच्या आरोग्यासाठी नीती जपणे. परंपरा आणि अधुनिक काळ यांची सांगड घालताना कितीही जीवनशैली बदलली तरी औचित्य राखत सामाजिक बांधिलकी राखणे. चांगलं-वाईट याविषयीच्या आपल्या कल्पना काळानुसार बदलतच असतात. म्हणजे पहा नं; एकेकाळी ट्यूशन-क्लास, गाईड वापरणे इत्यादी वाईटच समजले जायचे. वाईट म्हणजे अगदी वाईट नव्हे; पण ते ‘ढ’ मुलांचे आधार. आज अगदी ‘प्रीकेजी’ पासूनच ‘ट्यूशन्स’ असतात. क्लासेस तर काय; गल्लोगल्ली - नाकोनाकी उधाणले आहेत. हेच पोषाखाबद्दलही म्हणता येईल. एकेकाळी ‘सकच्छ कीं विकच्छ’ असा वाद वर्तमानपत्रातल्या लेखांतूनही खेळला जाई. (म्हणजे नऊवारी की पाचवारी?) आज? अगदी हौसेने कधी कधी नऊवारी नेसायचे तर तो एक मोठ्ठा ‘इव्हेंट’ ठरलाय. पाचवारीदेखील ‘ट्रॅडिशनल डे’ लाच नेसायला गंमत येतेय. पण पोषाखात कितीही अत्याधुनिकता आली तरी आपली मूल्यव्यवस्था कोलमडली का? तर नाही. संस्कृती बदलत गेली तरी मूल्य अमूल्यच राहिलं! आपली भाषा, आचार-विचार बदलले तरी कात टाकलेल्या आधुनिकतेतही आधुनिक रूपात मूल्य असतातच.

ती जपण्याची जबाबदारी प्रत्येक सुसंस्कृत माणसाने कोणत्याही काळात पेललीच पाहिजे. काही वेळा. काही व्यवसायात, काही पेशांमध्ये ती डळमळीत झालेली दिसतेय हल्ली. म्हणूनच अलिकडेच झालेल्या महानगर मराठी साहित्य संमेलनात ‘आजची पिढी आणि मूल्य व्यवस्था’ असा परिसंवाद आयोजकांना ठेवावासा वाटला ना? या परिसंवादात बरं का; वेगवेगळ्या क्षेत्रातील जबाबदार माणसं बोलायला होती. शिक्षणक्षेत्र, कलाक्षेत्र, क्रीडाक्षेत्र, व्यवसायक्षेत्र असा व्यापक परीघ घेऊन नामवंत आमंत्रित होते. कलाक्षेत्राचं प्रतिनिधीत्व केलं होतं संपदा जोगळेकरने. ही पाहुणी श्रोत्यांत वावरताना कुणी ‘हलो’ केलं तर आवर्जून ‘नमस्कार’ म्हणत होती. स्वत: शुभ्र साडी नेसून आली होती. आधीच्या परिसंवादातील वक्त्यांचे विचार अगदी एकाग्र होऊन ऐकत होती. म्हणजे इथं तिथं वावरताना एक सुजाण नागरिक, साहित्यप्रेमी म्हणूनच ती वावरत होती. म्हणूनच तिनं वक्ता म्हणून मांडलेले विचार संयत अन् विचार करायला लावणारे होते. कलाकार, कला, कला माध्यमं अन् आधुनिक काळातील प्रेक्षक (वा दर्शक?) याचं नातं मूल्यव्यवस्था तयार करणारे असते. तिच्या मते याची जबाबदारी कलाकार, प्रेक्षक अशी दोन्ही अंगांनी समाजाचीच असते. अगदी ‘टी.व्ही.’वर कलाकाराने कोणते व कसे कपडे घालावेत हे संयमाने आणि औचित्याने ठरवायचे असते; पण त्याचवेळी प्रेक्षकही ‘टी.आर.पी.’ वरखाली करून एखादी चांगली कलाकृती नेस्तनाबूद करतो; तेव्हा मूल्य जपण्याची - कलेशी इमान राखण्याची कलाकाराची धडपड मातीतच मिळते. तिने उदाहरण दिले ते ‘टिपरे’ मालिकेचे. ‘टी.आर.पी.’ घसरला अन् एक चांगली निरोगी मालिका संपवावी लागली. भार्गवी चिरमुले काम करत असलेली एक कौटुंबिक मालिका - त्यात तिचा सासुरवास संपला तसा प्रेक्षकांचा रस संपला - म्हणून मग पुन्हा त्या मालिकेत तिचा छळ सुरू झाला! अशावेळी कलाकारानेच फक्त मूल्य जपायचे का?... असा संपदाचा सवाल होता. विचार करायला लावणारा. सेन्सॉरच्या कचाट्यात सापडणार नाही याची काळजी घेऊन पडद्यावरचं चुंबन किती दीर्घ करायचं; ते ठरवलं जातं. पण ते असावंच का; याचा मूल्यविचार कुणी करतच नाही. चांगली प्रायोगिक नाटकं प्रेक्षकांअभावी रडतखडत चालतात; तर अंगविक्षेपांनी चावट अर्थाकडे वळणाऱ्या तथाकथित नाटकांचे प्रयोग भन्नाट वाट चालतात. अशावेळी कलाकारानं प्रेक्षकानुयायी व्हायचं; की मूल्य जपायचं?.... असे अनेक प्रश्न उभे करीत संपदाने मूल्य व्यवस्थेची ‘धनसंपदा’ दाखवून दिली. अशावेळी ‘काळ बदललाय’ असं म्हणून केवळ अगतिकता यावी का? येऊ नये. कारण काळ बदलला तरी जे अस्सल कलाकार असतात ते मूल्य जपतच काही अलौकिक घडवत असतात, त्यांच्या खऱ्याखुऱ्या ‘प्रयोगा’तून संस्कृती घडत असते. हो! हे अगदी खरं आहे. विद्यार्थी बदललाय, बदललाय म्हणताना हाच ‘विद्यार्थी’ भर समारंभात भेटला तर पाया पडतो तेव्हा कुठं त्याची ‘मूल्य’ सरणी बदललेली असते? ती बदलत नाहीच. काळानुसार ती फक्त कात टाकते इतकंच मला वाटतं.

हे खरंच आहे. कारण याच परिसंवादात क्रीडा क्षेत्रातील नीतिमूल्यांविषयीचे अनुभव मांडायला होते डॉ. रमेश माने. कोण हे रमेश माने? हे ‘फिजियोथेरीपिस्ट’ आहेत. रेकी मास्टर आहेत. ‘बॉडी बिल्डर’ ही आहेत. भारतीय क्रिकेटपटूंना ते मार्गदर्शन करत असतात, सहाय्य करत असतात. बोलायला अगदी शांत माणूस. कोणताही प्रश्न नाही, युक्तीवाद नाही. फक्त अनुभव आणि त्या अनुभवांवर आधारित त्यांचे ठोस विधान असे की आजचे सर्व क्रिकेट खेळाडू अत्यंत सुसंस्कृत आहेत. व्यक्तीगत जीवनात ते कितीही स्वतंत्री असले तरी खेळाच्या मैदानावर ते सगळीच मूल्ये जतन करतात. खेळाशी निष्ठ असतात. त्या संदर्भातील पूर्वसुरींच्या श्रद्धा ते जपतात. मैदानावर एकदा सचिन तेंडुलकरच्या हाताला दुखापत झाली. त्वरेने उपचाराची लगबग असताना सचिन म्हणाला ‘फक्त डॉ. मानेंना बोलवा’ मग या डॉक्टरांनी हातावर आणि मनोधैर्यावर शांतपणे उपचार केले. परदेशात खेळत असताना सचिन स्वत:च्या खोलीत एका बाजुला रमेश तेंडुलकरांचा (वडिलांचा) फोटो ठेवतो. शेजारी

(पान २ कॉलम १ वर)

संपादकीय

(पान १ कॉलम २ वरून)

आपली बॅट ठेवतो. मग डॉ. मानेंना बोलवून ती बॅट ‘हील’ करून घेतो. आधीची ‘निगेटीव्ह एनर्जी’ त्यामुळे निघून जाते. खेळाडूंसाठी डॉ. मानेंनी तऱ्हेतऱ्हेच्या ‘कॅसेटस्’ तयार केल्या आहेत. विराट कोहली मैदानात उतरेपर्यंत कानाला यंत्र जोडून ‘विष्णु सहस्त्रनामा’ची कॅसेट ऐकत असतो शांतपणे. उत्तर प्रदेशीयांसाठी ‘हनुमान चालीसा’ फार लागू पडतो असा डॉक्टरांचा अनुभव आहे. ही श्रद्धा नाही; तर उर्जा मिळविण्यासाठी, चित्त एकाग्रतेसाठी आणि खेळण्यावर प्रेम असल्यामुळे चांगली कामगिरी करण्यासाठी जपलेली मूल्ये आहेत. ही मूल्यं जपण्यासाठीच महेन्द्र धोनी परदेशातील डॉ. मानेंच्या अद्ययावत खोलीत आला तरी सोफा, खुर्ची आदी उच्चासने टाळून खाली मांडी घालून गालिच्यावर बसतो. विनंती केली तरी ‘तुमच्यासमोर मी खालीच बसणार’ म्हणतो. म्हणून डॉक्टरांचा सवाल असा होता की या खेळाडूंचे वैयक्तिक जीवन कितीही रंगबिरंगी असू दे, ते खेळातील मूल्यांचा आदर करतात. आजच्या पिढीकडे मूल्यनिष्ठा नाही; असं मुळीच म्हणता येत नाही.

मलाही हीच खात्री आहे. अनुभव आहे की जीवनशैली बदलली तरी मूल्यसंस्कार आणि संवर्धन तेच आहे. म्हणूनच ना, शिक्षण-व्यवस्थेवर कितीही टीका केली तरी लाखो विद्यार्थी परीक्षा निष्ठेने देत असतात, घडत असतात. शिक्षण व्यवस्थेतील मराठी भाषादिनीच उजेडात आलेली एक मसालेवाईक घटना. ‘बी.एम.एम.’च्या विद्यार्थीनीचे नाव किटे. इंग्रजी स्पेलींग ‘केआयटीइ.’ या परीक्षार्थीला यशस्वीतेचे प्रमाणपत्र देताना मुंबई विद्यापीठाकडून तिचं नाव चक्क पतंग (‘काईट’ या स्पेलींगवरून) असं दिलं गेलं! असे कितीही ‘पतंग’ शिक्षण व्यवस्थेने उडवले तरी मंडळी; आपले जीवनमूल्य आणि शिक्षणावरचा विश्वास अढळ आहे. म्हणूनच या विश्वासावरच विश्वास ठेवून मी सर्व परीक्षार्थींना मनापासून शुभेच्छा देते. यशस्वी व्हा.

*

## पाठारे प्रभु चॅरिटीज

पाठारे प्रभु चॅरिटीज या संस्थेतर्फे दि. १२ फेब्रुवारी २०१७ रोजी चॅरिटीजच्या ठाकुरद्वार येथील सुरेश विठ्ठल हॉलमध्ये वैद्यकीय चिकित्सा शिबीर भरविण्यात आले. सर्वांना विनामूल्य असणाऱ्या या शिबिराचे हे ४७ वे वर्ष होते. सकाळी साडेदहा ते दीड या वेळेत भरविलेल्या या शिबीराचा एकूण पंचावन्न सदस्यांनी लाभ घेतला. या वेळी हाडांची घनक्षमताही तपासली गेली हे विशेष. नेहमीप्रमाणे चॅरिटीजचे विश्वस्त डॉ. प्रदीप गजानन विजयकर यांनी हे शिबीर भरविण्यासाठी विशेष प्रयत्न केले. त्यामुळे डॉक्टरांचा प्रतिसादही चांगलाच होता. शिबीरार्थींना डॉ. परेश नवलकर यांनी आपल्या व्याख्यानाद्वारे हृदयरोगाविषयी माहिती दिली. हृदरोग झाला असता आणि त्यापूर्वीही कोणती काळजी घ्यावी याचे मार्गदर्शन त्यांनी केले. डॉ. प्रदीप ग. विजयकर, डॉ. सुनील द. आगासकर, डॉ. विद्याधर सु. आगासकर, डॉ. परेश नवलकर (सर्व जनरल प्रॅक्टिशनर्स) डॉ. सौ. ऋतुजा त. विजयकर (दंत वैद्य), डॉ. तन्मय प्र. विजयकर, डॉ. कु. वैशाली न. अजिंक्य, डॉ. कु. मिताली प्र. विजयकर (होमियोपाथ) डॉ. सौ. प्रीति भा. जयकर (शल्यविशारद), डॉ. भालचंद्र मा. जयकर (शल्यविशारद), डॉ. अमित जे. धुरंधर ( स्त्रीरोग तज्ञ) डॉ. फुलेन्द्र कोठारी (हृदय तज्ञ), श्री नितीन जे. कोठारी आणि सौ. रजनी एन. कोठारे (रक्त तपासणी आदी करणारे) या चौदा जणांनी शिबीरार्थींची विनामूल्य तपासणी करून मार्गदर्शन केले. या सर्वांचे सामाजिक योगदान ज्ञातीयांसाठी अमूल्य आहे.

चॅरिटीजच्या या उपक्रमाबद्दल अभिनंदन.

# प्रकाशातील परभू
# KISAN PRADHAN née KOTHARE

*(किसन प्रधान या पूर्वाश्रमीच्या कोठारे. त्यांची कर्तृत्वगाथा त्यांच्या सर्व कुटुंबीयांसह इथे दिली आहे. पारंब्या वाढत जाव्यात तसे हे सर्व कुटुंबीय एकाच झाडाच्या शाखा आहेत बहरत गेलेल्या -संपादक)*

Born into an affluent landed Pathare Prabhu family on 9th August 1928, Kisan Pradhan née Kothare was the third of six siblings. She spent her childhood in Girgaum, initially with her parents Gulab and Ramrao Kothare, and later with her adoptive grandparents Kamla and Khanderao Kirtikar.

**School**

Kisan's early education began at the Chandavarkar School situated in Benham Hall Lane, quite close to her home. The medium of instruction at this co-educational school was Marathi. After completing four years in this school, she joined the St. Theresa's school in the same locality. This was the beginning of her studies with English as the medium of instruction.

After a couple of years, she was enrolled in the Cathedral Girls School at Flora Fountain. Despite initial problems of coping with a new medium of instruction under mostly Europeans teachers, she fared well as a student. This was particularly so in subjects like arithmetic, mathematics, and Urdu. She won a ‘star prize’, awarded to a student for securing full marks in any subject, for two consecutive years. Additionally, she participated and excelled in sports like netball, badminton and gym, and won a prize for gym. Kisan was also involved in extra-curricular activities like theatre and dancing.

On completion of three years at the Cathedral Girls School in 1944, she was once again enrolled in the St. Theresa's School for the sixth year of schooling through the English medium. Finally, she completed her matriculation as a boarder in the Convent of Jesus & Mary, Pune.

Kisan's interest in vocal Hindustani classical music was encouraged and furthered during her training with Shri Datar. She was also inspired to learn tabla when she heard Shri Naik teach her brother. Her talents were recognized at competitions organized by the Pathare Prabhu community, where she was awarded books and certificates. She also learnt Kathak dance at the Gokhale Institute in Girgaum.

During her school vacations, Kisan would either travel with her grandparents, or spend time closer to Bombay (now Mumbai) in Matheran. It was in Matheran that she once again shone with her talent in sports and won medals and cups in a variety of events.

**Graduation**

Kisan completed her Bachelor's degree in Arts from Sophia College. During this period, she also studied Urdu with Professor N.S. Gorekar, and continued her training in vocal music under Purshottam Solankurkar. Her abiding passion in the arts led her to join Madame Menaka's dance class. As in her school years, Kisan also remained actively involved in college sports.

It was during this period that she had her first brush with collective action against restrictive practices of the authorities, and she resolved with boarders at the college hostel to challenge the enforcement of strict rules related to hostel curfews. During this time Kisan was a member of the National Union of Students, and Secretary of the World Student Service.

These were years marked by intense nationalist activity. While she was not conscious of any anti-British agitation or movement, she visited Gowalia Tank to witness the Congress session attended by Mahatma Gandhi and other leaders. She even attended Gandhi's prayer meeting at the Birla residence.

**Post-graduation**

In 1951, Kisan graduated with a Master's degree in Advanced Sociology from the School of Economics, when renowned sociologist Dr. G. S. Ghurye headed the Department of Sociology at the School. Kisan was a Founder Member of the Indian Sociological Society.

This was a phase that enriched her tremendously. Aside from her post-graduate studies, she spent evenings at the Asiatic Society Library and attended student meetings that brought her in contact with a wide variety of individuals quite distinct from the social milieu she was born in. And once again, she participated in collective action against the authorities - this time it was to challenge a fee-hike at the university.

More importantly, this was a significant phase in Kisan's life, as it brought about a sea-change in her worldview. She attended study circles on Marxism conducted by C.G. Shah, founder member of the Communist Party of India, and by Dr. Akshay Kumar Desai, eminent sociologist. She also found herself making more associations with other political activists, and was drawn deeper into the student movement and towards trade union and political activity. She was attracted to the Socialist Party and also joined the Young Socialist League. She was associated for a brief while with the Revolutionary Socialist Party. As part of her trade union activity, Kisan conducted a strike at the Sadhana Silk Mills in Worli.

**Legal practice**

After her post-graduation, Kisan graduated with a degree in law from Bombay University, and after being accepted into the Bar, she started her career as a lawyer. Her career spanned five decades, during which she appeared in cases ranging from criminal and civil matters to those pertaining to Workmen's Compensation, labour disputes, and even those related to compensation for victims of motor accidents. A prominent member of the Mazagaon Bar Association, an Association that felicitated her for the long stint there, Kisan also practised in several courts across the city. Significantly, she appeared for the Municipal Mazdoor Union in several cases at the instance of the trade union leader George Fernandes, who several decades later went on to becoming a Cabinet Minister at the Centre.

**Vasant Pradhan**

When Kisan was in the School of Economics, she met Vasant Pradhan, who was then a full-timer with Mill Mazdoor Sabha, the trade union wing of the

(पान ३ कॉलम १ वर)

(पान २ कॉलम ४ वरून)

Socialist Party. An association that came about as a result of their common political interests, transformed into a partnership for life when they got married in 1953.

Born on June 16 1924, Vasant Pradhan began his public life in 1942, when he was arrested for participating in the Quit India Movement and underwent jail terms. At the time, he was still a matriculate student at the King George English School in Dadar. His father Gangadhar Pradhan, had a transferrable job as a Post Master, and consequently, Vasant Pradhan pursued his academic education in various towns and cities like Alibag, Jalgaon, Mumbai and Baroda. He reached the Inter Arts stage of his academic career, but remained involved in the student movement and the trade union movement.

He worked for the Socialist Party that was formed after the Congress Socialists broke away from the Congress. The Socialist Party established the Mill Mazdoor Sabha and Vasant was a full-time worker in the Sabha under the leadership of Raja Kulkarni. Vasant underwent imprisonment for trade union activity during this period. However, there was discontent among some Party workers regarding the functioning and policies of the Party. Vasant was part of this discontented group and he was expelled by the Party for what was considered anti-Party activities. Thereafter, Vasant did not become a member of any political party, but he always remained fiercely anti-communal and sympathized with progressive causes.

Vasant had to leave the Mill Mazdoor Sabha after he was expelled from the Socialist Party. Through intellectuals in the North Bombay Students Congress, Vasant came in contact with senior journalist Dr. G.M. Chitnis. Under the guidance of Chitnis, Vasant began his journalistic career in *Chitra,* a Marathi daily. Later, he became Editor of this daily. The Samyukta Maharashtra Movement started soon thereafter and Vasant had serious disagreements with the Proprietor of the daily regarding his editorial stance towards the Movement. This led to his dismissal from *Chitra*.

In 1956, Vasant along with his wife Kisan, started *Zunjar*, a Marathi evening daily. This newspaper was in circulation for ten years, despite several obstacles. But they had to shut down operations and it was now time to gain experience in a leading established newspaper. Vasant became Sub-Editor of *Loksatta* in 1969 and retired from this post in 1984. During his stint at *Loksatta*, Vasant worked in the Indian Express Newspapers' (Bombay) Employees Union, and he was also suspended from duty for a while for this union activity. Even after retiring from Loksatta, Vasant was associated with this union for another fifteen years.

Along with his journalistic career, Vasant also authored several books on labour law. He was President of Mani Bhavan Gandhi Sangrahalaya, Honorary Secretary of Gandhi Smarak Nidhi, Mumbai, and President of Gandhi Film Foundation.

Vasant Pradhan died on February 1, 2015, at the age of 90.

**Nishita Mhatre née Pradhan**

The eldest of three children born to Kisan and Vasant Pradhan, Nishita Mhatre was a student of the Cathedral and John Connon School, Mumbai from 1961 to 1967. She was a boarder at the St. Mary's School in Pune from 1968 to 1971. Nishita graduated with a B.Sc. in Microbiology from Sophia College, Mumbai, and then studied Law at the Government Law College, Mumbai.

She started practicing in November 1978 in the Bombay High Court, Labour and Industrial Courts and other subordinate courts.

Nishita was appointed as Additional Judge of the Bombay High Court in March 2001, and was confirmed in March 2003. She was transferred to the Calcutta High Court on 6th January 2012. On 1st December 2016, Nishita was appointed Acting Chief Justice of Calcutta High Court.

Nishita married **Nirmal Mhatre** in January 1986. Nirmal is the son of Laxmikant Mhatre and Krishnanalini Kirtikar. After completing his schooling from St. Paul's School, Parel, he went on to Podar College and graduated with a B.Com. degree, and then an M.Com. degree from the University of Mumbai. He represented his school and college in football and played professionally as well as for various companies and the Maharashtra State Police. Nirmal played club cricket while in college, and also as an employee of the Associated Cement Co. Ltd. While representing ACC Ltd against the Tata Sports Club, he won the Best Bowling Prize in 1982 in the Times Shield Tournament, and also in 1986 in the Mahindra Shield Tournament. Nirmal represented Shivaji Park Gymkhana and other cricket clubs for several years. He was in the Ranji Trophy probables in 1983. Nirmal's maternal uncles, Raghunandan and Prabhakar Kirtikar, were well known cricketers in 1930-40 from the Pathare Prabhu community.

Nishita and Nirmal have one son **Sushan** who is a practicing advocate. He completed his schooling at the St. Stanislaus High School, Bandra, and represented his school for football. Interestingly, his great grandfather Ramrao Kothare was a former student of this school. Sushan did his graduation in Mass Media before his securing a degree in Law. He is married to **Mridula Sail** a web designer.

**Deepti Pradhan**

Deepti Pradhan, Kisan and Vasant Pradhan's younger daughter, did her schooling at the Cathedral and John Connon School, Mumbai, and later as a boarder at the St. Mary's School in Pune. She completed her graduation from the Sophia College, Mumbai, and her post-graduation in Biochemistry from The Maharaja Sayajirao University, Baroda. Deepti graduated from IIT in 1986, with a Ph.D. from the Chemistry Department. After postdoctoral training at Pennsylvania State University and Cornell University, she joined the faculty of the Department of Pathology at Yale University. Deepti also held a joint faculty position at the University of New Haven, in the Department of Biology.

More recently, Deepti has diversified her interests by lending her scientific insight to research in Yale's Office of Development. Her work in this capacity was recognized with the Linda K. Lorimer award in 2016 – it is the highest honor awarded to Yale University staff members for distinguished service to the institution.

Deepti continues to feel very strongly about giving back to society, and to that end she started an independent venture in 2008 - a science café that brings scientists of all stripes to speak to a lay audience. She uses this vehicle not only to reach out to local residents in her area, but also to the wider internet population by sharing videos of these science cafes. For these efforts, she has been recognized with several awards including Person of The Week from The Sound; American Chemical Society's Innovative Science Outreach Award; and the Rika Welsh Community Impact Award.

In 2015, Deepti was awarded a Public Voices Fellowship by the Yale University Women Faculty Forum for women and under-represented minority scholars. This has resulted in her publishing Op-Ed pieces and other articles on science related topics in leading publications like The Huffington Post. Her passion to improve the communities she has lived in has resulted in her being involved as an active board member in organizations that are dedicated to improving school education, and also being involved as a mentor and judge for a variety of science competitions. Likewise, because of the depth of her experience as a successful scientist, and her experience as a cancer survivor, she has been selected as a patient-advocate to secure funding for cancer research, as well as improve the experience of patients at Smilow Cancer Hospital.

Outside the work environment, Deepti is an avid music lover and has studied the sitar when she was in college. She keeps up her interest and participation in sports that began right from school through college, by playing badminton, table tennis, and taking long bicycle rides when she can.

Deepti is married to **Suresh Shenoy**, who after obtaining a B.Sc. from St. Xavier's College in Mumbai, graduated with the C.S. Patel gold medal for M.Sc. in Biochemistry from The Maharaja Sayajirao University in Baroda. He completed his Ph.D. from Tulane University and after a very successful career in academia, he moved to the biotechnology

(पान ५ कॉलम १ वर)

**हसरी रेखा** -प्रदीप कोठारे



**कथाकली**

# तोरा

**-सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर**

श्रेयस संध्याकाळी घरी आला तोच एकदम विमनस्क स्थितीत. आल्या आल्या तसाच हॉलमधल्या सोफ्यावर बसला नी मान मागे टेकवून पाय पसरून सैलावला. त्याची चाहूल ऐकून उर्मिला आणि आनंद हॉलमध्ये आले. 'श्रेयस आलास? बरं झालं... अं माझी औषधं तू येताना आणणार होतास ती आणलीयस का? आणि नसली आणलीस तर काही हरकत नाही. आम्ही रोजच्यासारखे फिरायला बाहेर पडतोय, तेव्हा येताना आणू'' - आनंद म्हणाला. त्याचं श्रेयसकडे लक्षच नव्हतं.

''श्रेयसऽऽ, काय झालं रे? असा काय बसलायस?'' आनंदाच्या मागून आलेल्या उर्मिलाचं श्रेयसकडे लक्ष जाताच तिनं विचारलं. त्यामुळे एकदम दचकून आनंदनं त्यांच्याकडे बघितलं.

''तुम्ही दोघंही आज फिरायला जाऊ नका. इथे माझ्याजवळ बसा. सृष्टीला हाक मारा' - श्रेयसनं काहीही हालचाल न करता डोळे मिटूनच उत्तर दिलं - आणि पुढे म्हणाला 'संपलं सगळं.' ते ऐकून भयभीत होऊन उर्मिलानं सृष्टीला हाक मारली. ''सृष्टीऽऽ, ए सृष्टीऽऽ, लवकर ये - हा श्रेयस बोलावतोय - लवकर' हाका ऐकून बाहेर आलेली सृष्टी श्रेयसला तसा बसलेला बघून घाईघाईने त्याच्याजवळ जाऊन बसली आणि तिनं विचारलं - ''काय झालं श्रेयस? मघाशी आतून ऐकलं मी. संपलं सगळं म्हणजे काय? नीट सावकाश सांग.''

श्रेयस उठून बसला आणि त्या तिघांकडे आळीपाळीने बघत म्हणाला - ''अगं; या बिल्डिंगचे पंधराच्या वरचे सगळे मजले अवैध ठरलेयत. आपण अठराव्या मजल्यावर आहोत. बिल्डरनं फसवलंय सगळ्यांना.'' आनंद आणि उर्मिला मटकन बसले.

''अरे देवा! पण तुला हे आत्ता कसं कळलं?''

''अगं देशपांडे आहेत नं, आपल्या सोसायटीचे सेक्रेटरी? ते भेटले होते - बी.एम.सी.ची. नोटीस आलीय म्हणत होते. उद्या ते रीतसर सगळ्यांना ही गोष्ट कळवतीलच..''

सगळेच कपाळाला हात लावून बसले. कुणालाच काहीच कळेना... सगळे सुन्न झाले.

ही बातमीच एवढी भयंकर होती.

श्रेयसला आलेला बघताच स्वैपाक्यानं नेहमीप्रमाणे सर्वांचा चहा आणला. त्यानं त्यांच्या पुढ्यातल्या टिपॉयरवर ठेवला आणि तो आत निघून गेला.

बराच वेळ सगळे तसेच सुन्नपणे बसून राहिले... पुढ्यातला चहा पाऽऽर निवून गेला.

स्वैपाक्यानं नाश्त्याच्या बशासुद्धा पुढ्यात आणून ठेवल्या. पण तिकडे कुणाचंच लक्ष नव्हतं.

स्वैपाक्यानं विचारलं - ''साहेब, दुसरा गरम गरम चहा आणू का?''

श्रेयसनं मानेनंच 'नको' अशी खूण केली... सगळ्यांच्या तोंडची चवच निघून गेली होती.

''आता काय करायचं?'' श्रेयसनं हा प्रश्न कसाबसा उच्चारला.

''अं... म्हणजे, बी.एम.सी.हे वरचे मजले पाडणार?'' आनंदनं निर्जीव स्वरात विचारलं.

''तसंच काहीसं समजा.'' श्रेयसनं निर्जीव उत्तर दिलं. ''पण आपण केस करू शकतो बिल्डरवर'' उर्मिला पोटतिडीकीनं म्हणाली.

''त्याचा काय उपयोग आहे आई? बी.एम.सी. आपल्याला फ्लॅट रिकामा करायला लावणारच. शिवाय केसमध्ये वेळ जाईलच. पण कशावरून आपण ती केस जिंकू? शिवाय बी.एम.सी. एक विवक्षित मुदत देते. त्या अवधीत फ्लॅट रिकामा करावाच लागेल...

''नाही केला तर...?''

''तर एक दिवस अचानक बी.एम.सी.चे लोक पोलीस बंदोबस्तात वरचे मजले पाडायला सुरुवात करतील...''

''बापरे! पण आपण जाणार कुठे? नी हे सामान? काय करायचं हो?'' उर्मिला कासावीस झाली.

''अं... मला एक कल्पना सुचतेय'' - श्रेयस म्हणाला.

''काय?'' - तिघांच्या डोळ्यात उत्सुकता चमकली. ''मी ऑफिसच्या क्वाटर्ससाठी प्रयत्न करतो.'' श्रेयस उत्तरला.

''हां - ही छान आहे कल्पना'' सृष्टी आनंदानं म्हणाली.

''आता सुटेल. पण पुढे सौरभ रिटायर झाल्यानंतर पुन्हा हाच प्रश्न पडेल'' - आनंद म्हणाला ''किंवा त्यानं नोकरी बदलली किंवा याच नोकरीत वरच्या पदावर चढला किंवा त्याची मुंबई बाहेर बदली झाली. पुन्हा पुन्हा सामान हलवणं जमणार, झेपणार नाही आम्हाला.''

''बाबा, हे माझ्या लक्षातच आलं नाही. तसं झालं तर फारच केविलवाणी परिस्थिती होईल.''

''नक्कीच कुणाची तरी दृष्ट लागली असेल.'' उर्मिला म्हणाली.

''नक्कीच तुझ्या त्या मध्यमवर्गीय नातेवाईकांचीच असेल. मी दिलेला तुझा हिऱ्यांचा हार बघवला नसेल त्यांना पार्टीच्या वेळी.'' श्रेयस करवादला.

''काहीतरीच काय बोलताय तुम्ही दोघं? अरे, हे संकट सोळाव्या मजल्यापासून शेवटच्या बावीसाव्या मजल्यांवर राहणाऱ्या कितीतरी कुटुंबांवर कोसळलंय. कितीतरी लोक बेघर होणार आहेत. आता दुसरा फ्लॅट घ्यावा लागेल. पण टॉवर नको हं. परवडणार नाही. या किंमती खूप आहेत शिवाय तुझासुद्धा खूप खर्च झालाय.''

''बाबा, पडदे, सोफा कव्हर्स, काही फर्निचर नी घरातल्या इतर काही बाबींचे, मोटारचे पैसे ऑफिसनं दिलेयत. पार्ट्यांचे पैसेही ऑफिसनं दिले. नोकरांपैकी एक नोकर नी ड्रायव्हर यांचे पगारही ऑफिस देतं. पेट्रोलसुद्धा ऑफिसच्याच खर्चानं भरतो मी.''

''पण दुसऱ्या मोटारीचा, पेट्रोलचा ड्रायव्हरचा खर्च तूच केलास नी करतोयस. आम्हा दोघांना हिऱ्यांची भेट दिलीस. घरात वापरायला. सगळ्यांसाठी महाग कपडे नी उर्मिलाला सिल्कच्या साड्या आणल्यास. अरे आता आमचे डॉक्टर, औषधं यावरचे खर्च खूप वाढलेयत. आमचं सेव्हिंग आता काढलं तर छोट्या मोठ्या सगळ्याच गोष्टींसाठी तुझ्यापुढे हात पसरावे लागतील.''

''मी ज्योतीला फोन करते. आपला जुना फ्लॅट तेच तर वापरतायत. मी तिच्याकडून तो परत घेते. तिचा स्वत:चा फ्लॅट आहेच की तिला.''

''नको. तिच्याशी पार्टीला बोलावण्यापुरताही संपर्क ठेवलेला नाही आपण. नाहीतर मग श्रेयसच्या म्हणण्याप्रमाणे कुठेतरी दुसरा फ्लॅट, टॉवर सोडून साध्या बिल्डिंगमधला, जुनासुद्धा चालेल. तो घेऊ आपण.''

''बघ बुवा, पण मी नाही हं तिच्या नवऱ्याला फोन करणार याच्यासाठी.''

''अं.. बाबांनी एक फ्लॅट माझ्या नावावर ठेवलाय. तो मिळेल का; ते बघते.'' सृष्टी म्हणाली.

''अगं, तो कसा मिळेल? भाडेकरू ठेवलेयत नं तिथे? त्याला मुदत संपायच्या आधी मध्येच नाही काढता येणार'' उर्मिला घाईघाईनं म्हणाली. 'सुने'च्या फ्लॅटमध्ये जाणं तिनं टाळलं.

''आणि मलासुद्धा बायकोच्या फ्लॅटमध्ये नाही राहायचं.'' श्रेयसनंही ती कल्पना पाऽऽर खोडून काढली.

''मला तरी ज्योतीचाच पर्याय योग्य वाटतोय.'' उर्मिला म्हणाली.

''असं करू या, प्रत्येकानं आपला प्रयत्न सुरू करू. शेवटचा निर्णय सर्वांनी मिळून पूर्ण विचारांती घेऊ.'' आनंदनं सुचवलं.

''पण मी त्या बिल्डरला सोडणार नाही. केस करीनच त्याच्यावर'' श्रेयस रागानं म्हणाला.

''श्रेयस, शांत हो बेटा. अरे, हे केस करणं नी त्यापेक्षाही ती निभावणं सोपं नसतं रे. जरी सगळ्या फ्लॅटधारकांनी मिळून लढवली नं, तरीही त्यात वेळ, पैसा, शक्ती सगळंच खर्च होईल.!

म्हणजे काय बाबाऽऽ? त्या बिल्डरला सुटा सोडायचा?.. माझे केवढे पैसे खर्च झालेयत!''

''म्हणूनच म्हणतोय, आणखी पैसे खर्च करायचे? वर्षानुवर्षे केस लढवायची, निकालाची प्रतिक्षा करायची. काय अर्थ आहे त्यात?'' - उर्मिलानं आनंदची बाजू घेत प्रतिप्रश्न केला.

''त्यापेक्षा... पैसे चारून केस जिंकायची'' श्रेयस म्हणाला

''आणि काय गैर आहे त्यात? प्रतिपक्षही तेच करणार ना?

''अरे, पण सगळेच बिकाऊ नसतात ना बेटा! आणि उगीच बीएमसीच्या अधिकाऱ्यानं किंवा कोर्टाच्या जज्जनं लाच देण्याचा प्रयत्न करतो म्हणून तुम्हा लोकांनाच अडकवलं तर? तू किती लोकांकडून पैसे घेऊन काम करतोस? नाही ना! मग ते तुझ्यासारखेच प्रामाणिक असतील तर?''

त्यांची ही चर्चा चालू असतानाच उर्मिलानं आतल्या खोलीतून ज्योतीला फोन केला. तिला सगळं सांगितलं आणि...

थोड्याच वेळात उर्मिला हसत हसत बाहेर आली '' अहोऽऽ ऐका सगळे - ज्योती नी शिरीष आपला फ्लॅट आपल्याला परत द्यायला तयार झालेयत. तेही कमी पैशांमध्ये. कारण नाही म्हटलं तरी एक वर्ष वापरलाय त्यांनी तो फ्लॅट..''

जुनाच फ्लॅट परत मिळणार म्हणून उर्मिला अत्यानंदित झाली.. तर आनंदनं सुटकेचा नि:श्वास टाकला.

सृष्टी टॉवर सोडायला लागेल या विचारानं खट्टू झालेल्या श्रेयसनं नाईलाजानंच हे पटवून घेतलं...

त्या सगळ्यांचा टॉवरमध्ये राहण्याचा तोरा उतरला होता. कधी ना कधी त्या टॉवरचा तोरासुद्धा संपुष्टात येणार होता.

*

## पाठारे प्रभु सोशल समाज

मंगळवार, दि. २८-३-२०१७ - गुढीपाडव्याला समाजाचा वर्धापन-दिन आणि पुरस्कार सोहळा आयोजित केला आहे. श्रीम. मृदुला प्रभुराम जोशी (पूर्वाश्रमीच्या आगासकर) यांच्या अध्यक्षतेखाली पा. प्र. हाऊसिंग सोसायटीचे सांस्कृतिक केंद्र सभागृह, खार येथे सायंकाळी ५ वाजता होणाऱ्या कार्यक्रमाला रसिकांनी बहुसंख्येने यावे.

## परीक्षेतील सुयश

**पी. एच. डी. (मुंबई विद्यापीठ)**

डॉ. रोशनी यतीन (व्यवहारकर) सरदेसाई

**मास्टर ऑफ सायन्स (एम. एस.) इन कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनियरिंग (सॅण्टा क्लॅरा युनिव्हर्सिटी)**

श्री. प्रमेय महेन्द्र कीर्तिकर

(पान ३ कॉलम ४ वरून)

sector where he could apply his scientific skills to developing novel DNA sequencing methods, and for drug discovery. For his efforts, he has been awarded a number of patents, and was also recognized with a Special Achievement Award for his contributions to the organization. His most recent appointment has been Director of Molecular Biology and Biochemistry at Roche Life Sciences. Suresh is also keen on giving back to the community he lives in, and to that end he has recently begun to help with teaching children in the 8-10 year range, as well as in the 16-20 year range.

Suresh is a dedicated long distance runner and has successfully completed half-marathons, marathons, and ultra-marathons, including the well-recognized New York marathon.

Deepti and Suresh have two sons **Agasthya Pradhan-Shenoy** and **Ashvin Pradhan-Shenoy**. After graduating with a Bachelor's degree in psychology, anthropology and mathematics, Agasthya has dedicated himself to teaching mathematics to high school children in underprivileged urban neighborhoods. He is passionate about music and plays the flute and double bass, and over the years has been a part of the Shoreline Youth Symphony. He is also a composer of contemporary music in an eclectic genre, and has independently released two records with reasonable success. Like his parents, he also runs and bikes, and in 2015 undertook a 1500 km bike ride from Vietnam where he was teaching, to Thailand, before returning home. Agasthya is engaged to be married to Caroline Dorr, in September 2017. Caroline graduated with a BBA in Management. After a fellowship with Kiva, which took her to help microfinance institutions in Indonesia, she currently works at Lucid, a software company focused on market research. Next year, she plans to work towards a Master's degree in International Business, which will open opportunities for her in international development - her primary area of interest.

Ashvin, the younger of the two, is currently in the third year of his college education in Canada, at the end of which he will have a Bachelor's degree in computer science and history. He too has studied music – piano and cello – and has also been a member of the Shoreline Youth Symphony. Ashvin is an enthusiastic runner and has run both track and cross-country for his school team.

**Aneesh Pradhan**

Youngest of Kisan and Vasant Pradhan's children, Aneesh Pradhan did his schooling at the B.P.M. High School at Khar. He completed his graduation and post-graduation in History from the Elphinstone College, Mumbai.

Aneesh is one of India's leading *tabla* players. He is a disciple of the illustrious *tabla* maestro Pandit Nikhil Ghosh from whom he inherited a rich and varied repertoire of traditional *tabla* solo compositions from the Delhi, Ajrada, Lucknow, Farrukhabad and Punjab *gharanas*.

Greatly appreciated by both the cognoscenti and the lay listener as a soloist and accompanist, Aneesh is the recipient of several awards such as the Aditya Birla Kala Kiran Award (2000), the Natyadarpan Award for 'Best Background Score' (1998) for music direction to the Marathi play 'Tumbara' directed by Sunil Shanbag, the Vasantotsav Award (2012) instituted in memory of the eminent vocalist Dr. Vasantrao Deshpande, and the Saath Sangat Kalakar Award (2013) instituted in memory of G.L.Samant by the Gandharva Mahavidyalaya, Pune.

A popular performer at most prestigious concerts and festivals in the country, Aneesh has also traveled widely and performed overseas at major events. He has also recorded prolifically for national and international record labels accompanying a host of vocalists and instrumentalists.

Aneesh broadcasts regularly on Indian radio and television. He has also been featured on radio and television networks overseas and was one of the presenters for a radio series entitled "Perspectives – North Indian Classical Music" featured on the Australian Broadcasting Corporation.

Apart from his work with art music, Aneesh is also a frequent participant in intercultural musical collaborations both in the capacity of performer and composer. Drawn equally towards melody and rhythm, Aneesh's compositions range from pieces composed for *tabla* solo repertoire, to melodic and text-based compositions that are based on traditional vocal and instrumental forms of Hindustani music. He is keen to push the envelope in experimenting with sound and music through his composition for film, television, theatre and dance projects. Aneesh has also been a member of the Japan-based Asian Fantasy Orchestra since 1998, and has also participated as composer and performer in an ongoing collaboration with the Ensemble Modern, Frankfurt, since 2003. Some of his intercultural collaborations have also been released commercially.

Aneesh's teaching assignments in the past include stints as artist-in-residence at the University of New England, Australia, and as guest lecturer at the Music Department, University of Mumbai. He was Senior Research Fellow at the Department of Music, Media and Cultural Studies, Macquarie University, Australia, and was Adjunct Research Fellow at the India Research Centre, Macquarie University, Australia. He regularly conducts lecture-demonstrations, workshops and participates in seminars, at various universities and other educational institutions in India and abroad. Aneesh has been Adjunct Senior Research Fellow in the Sir Zelman Cowen School of Music, Monash University, Australia.

Aneesh was awarded the Indian Council for Cultural Relations Chair in Indian Studies at the Sir Zelman Cowen School of Music, Monash University.

His study and research in the area of History, which he studied at the University of Mumbai has earned him a doctorate. He writes frequently on music for newspapers, journals and other publications in India and abroad and is also deeply involved in creating and developing educational material related to Indian music. He is the author of a children's book on *tabla*, which is part of a forthcoming twelve book series entitled *Baajaa Gaajaa: Musical Instruments of India*. He has also written *Tabla: A Performer's Perspective*, which gives an overview of the stylistic features and performance contexts of the instrument. He has been awarded a medal by the Asiatic Society of Mumbai for his book entitled *Hindustani Music in Colonial Bombay*. His latest ebook is called *Hindustani Music: Ways of Listening*, a collection of articles that he had written over two years for Scroll.in, a digital publication. He has also directed and produced a short film entitled *Pratidhvani: Reverberations of the Nanasaheb Panse Pakhawaj Tradition*.

Aneesh is the Director of Underscore Records Pvt. Ltd, an independent online record label that he established with his wife Shubha Mudgal, a prominent vocalist and composer. He also co-curates with Shubha, an international music festival called Baajaa Gaajaa: Music from 21st Century India.

Born into a musically dedicated family, Shubha Mudgal has been trained by some of the finest musicians and musicologists in India. Trained by eminent scholar-musician-composer Pandit Ramashreya Jha 'Ramrang', she also received guidance from Pandit Vinaya Chandra Maudgalya and Pandit Vasant Thakar. She later learnt stylistic techniques from well-known maestros Pandit Jitendra Abhisheki and Pandit Kumar Gandharva. She also received training in thumri from Smt. Naina Devi and is thus a versatile and popular performer.

In addition to being a performer, Shubha has also won recognition as a composer. She received the Gold Plaque Award for Special Achievement in Music at the 34th Chicago International Film Festival, 1998. She is the recipient of numerous awards including the Padma Shri from the Government of India in the year 2000, and the Yash Bharati Samman from the Government of Uttar Pradesh in 2015.

She has also been closely involved with several projects related to music education in India. Formerly a member of the Central Advisory Board of Education constituted by the Government of India, Shubha also chaired a focus group discussing the need for introducing an arts education program in mainstream school education during the National Curriculum Framework 2005. She was also a Nana Shirgaokar Visiting Research Professor for traditional music at Goa University.

⁕

## स्वरसत्कार



This is a photo, taken soon after Sujan Rane's concert at Mumbai Marathi Sahitya Sangh, on Sunday 5th February, organized by Swar Sadhna Samiti, Mumbai, which is known for promoting Hindustani Classical Music. He was interviewed by the Mumbai DD Sahyadri team along with his performance.

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणाची डायरी

### नांदा सौख्यभरे

| | | |
|---|---|---|
| ११-२-१७ | श्री. ओमकार निनाद केशव धैर्यवान | कु. ईश्वरी श्रीकांत गणेश वैद्य (आं. ज्ञा.) |
| १४-२-१७ | श्री. सुशील यामिनीकांत कोठारे | कु. श्रेया नरेन्द्र भुरण (आं. ज्ञा.) |

### विवाह माणिक महोत्सव

| | | |
|---|---|---|
| २०-२-१७ | श्री. उल्हास मोरेश्वर राणे. | कु. जयश्री कृष्णनाथ देसाई |

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ७-२-१७ | श्रीम. रजनी विनोद कोठारे, | वय ८१, | अंधेरी, चारबंगला |
| ११-२-१७ | श्री. सुरेन्द्र इंद्रसेन कीर्तिकर, | वय ८८, | खार |
| १२-२-१७ | श्रीम. स्मिता (उषा) माधव कीर्तिकर, | वय ८४, | लंडन |
| १४-२-१७ | श्रीम. सुप्रिया सुभाष राव, | वय ७०, | विरार |
| १४-२-१७ | श्री. नंदकुमार सीताराम सेंजित, | वय ८२, | पुणे |
| १४-२-१७ | श्री. अरुण सुंदरराव धुरंधर, | वय ७७, | बोरीवली |
| १४-२-१७ | श्रीम. लैला सुरेश कीर्तिकर, | वय ७३, | भिमराववाडी, गिरगाव |
| १५-२-१७ | श्री. विष्णू गजानन वाझकर, | वय ९०, | अंधेरी |
| २८-२-१७ | श्रीम. मंगला दत्तकुमार धराधर | वय ८९, | खार |

## प्रभुतरुणास देणगी

∗ श्री. शैलेन्द्र सुरेन्द्र कीर्तिकर, श्री धीरेन एस. कीर्तिकर आणि ममता एस. कीर्तिकर यांजकडून प्रभुतरुणास देणगी रु. ७००७/-

∗ कै. पद्मावती (केशर) शामराव कोठारे यांच्या (२७-२-२००४) स्मृतिदिनानिमित्त रेणुका धुरंधर यांजकडून प्रभुतरुणास देणगी रु. ५०१/-

∗ श्री. शैलेश सुरेन्द्र कीर्तिकर, सिंगापूर यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ५००/-

∗ श्री. समीर श्रीकांत रणजीत यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ५००/-

∗ सौ. निशा दीपक जाधव राणे यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ५००/-

∗ कुमार पर्जन्य पवन कीर्तिकर याच्या व्रतबंधनाप्रीत्यर्थ श्री. प्रदीप आ. कीर्तिकरकडून रु. ५००/-

∗ श्री. आनंद शामराव तळपदे आणि सौ. श्रुता आनंद तळपदे यांजकडून त्याच्या माणिक महोत्सवी विवाहप्रसंगानिमित्त रु. ५००/-

सौ. श्रुता आणि श्री. आनंद यांचे अभिनंदन.

सर्व देणगीदारांचे आभार

✳

## अभिनंदन

∗ हिरानंदानी इस्टेट, ठाणे येथे आयोजित केलेल्या मॅरॅथॉन स्पर्धेत डॉ. अश्विनी वाघ (पूर्वाश्रमीच्या अश्विनी शिवनाथ देसाई) यांना पदक प्राप्त झाले.

∗ 'झी' वाहिनीवर सध्या चालू असणाऱ्या 'चूकभूल द्यावी घ्यावी' या मालिकेचे दिग्दर्शन श्री. स्वप्नील जयकर यांचे आहे.

∗ 'झी युवा' वाहिनीवर 'प्रेम हे' ही नवी मालिका सुरू झाली. याचे 'क्रिएटिव्ह हेड' (निर्मिती प्रमुख) म्हणून श्री. अनुराग दीपक तळपदे यांची नियुक्ती झाली.

∗ पुणे विद्यापीठाशी संलग्न नाशिक येथील 'प्रशांतदादा हिरे कॉलेज ऑफ केटरींग ॲण्ड हॉटेल मॅनेजमेंट' तर्फे विद्यापीठीय अभ्यासक्रमांतर्गत चर्चासत्रात चॉकलेट, शुगर क्राफ्टसाठी बिंबा मनोज नायक सहभागी झाल्या होत्या. याच संदर्भात त्या बँकॉक येथेही सहभागी होणार आहेत.

सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन

✳

## चुकीची दुरुस्ती

∗ कृपया गतांकी सौ. ज्योत्स्ना आणि श्री रामकृष्ण तळपदे यांजकडून विवाह सुवर्ण महोत्सवाप्रीत्यर्थ देणगी रु. ५०१/- अशी वाचावी.

∗ गतांकी श्री. प्रताप मो. वेलकर यांचे देणगीदार म्हणून नाव मुद्रण चुकीमुळे श्री. प्रदाप असे छापले गेले आहे. दिलगीर आहोत.

संपादक,
प्रभुतरुण

मला माझे पती कै. प्रवीण शामराव वेलकर ह्यांच्याबद्दल दोन शब्द लिहावे असे केव्हापासून वाटत होते. त्यांना जाऊन १३ एप्रिल २०१७ रोजी दोन वर्षे होतील. ते सिडकोमध्ये कार्यकारी अभियंता होते. ते सज्जन, निर्व्यसनी, नॉन-करप्ट, सभ्य व निर्मळ स्वभावाचे होते. त्यांना गाण्याची आवड असल्याने ठाकूरद्वारच्या व्यंकटेश मंदिरातील अभंगयात्रेत ते भाग घेत असत. हे खूप अंगमेहनती होते.

सिडकोमध्ये ते कार्यकारी अभियंता होते आणि मित्रांना त्याचे कौतुक होते.

त्यांनी सहा वर्षात कार्यकारी अभियंता म्हणून नव्या मुंबईतील वाशी, सानपाडा, जुईनगर, नेरूळ, बेलापूर, खांदेश्वर ह्या अत्याधुनिक रेल्वे स्थानकांच्या बांधकामामध्ये खारीचा वाटा उचलला. तसेच जुईनगर येथील पादचारी पूलदेखील त्यांनी बांधला. पामबीच रोड बांधण्यातही यांचा सहभाग होता.

मला माझ्या पतीबद्दल खूप अभिमान आहे. माझ्या मुलांनासुद्धा वडिलांबद्दल आदर आहे. आमच्या कुटुंबाला कोणाचीही हाजी-हाजी करणं जमलं नाही व जमणारदेखील नाही. हल्लीच्या जगाला खोटे वागणारी व लोकांवर स्तुतिसुमने उधळणारी माणसे आवडतात.

असो, मला देवाकडे एकच मागणे मागायचे की, जन्मोजन्मी आम्हा दोघांची जोडी कायम ठेव.

आपली आभारी,
ज्योती प्रवीण वेलकर

## पाठारे प्रभु महिला समाज

रविवार, दिनांक १६ एप्रिल २०१७ रोजी पा. प्र. सोसायटीच्या खार येथील सांस्कृतिक केंद्र सभागृहात महिला समाजाचे चैत्रगौरीचे हळदीकुंकू होणार आहे. दुपारी ४ वाजल्यापासून होणाऱ्या या समारंभात सभासद भगिनींकरिता विविध स्पर्धांचे आयोजन केले आहे. त्याबद्दलची चौकशी इच्छुकांनी चिटणीसांकडे करावी. समारंभास महिलांनी भरघोस प्रतिसाद द्यावा.

बक्षिससमारंभाचा वृत्तांत पुढील अंकी.

**Statement about ownership and other particulars about news paper**

**PRABHU TARUN**
**Form IV (See Rule 8)**
**To be published in the first issue after the last day of February**

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | Place of Publication | : | B3 Parijat Patel Estate, Jogeshwari, Mumbai-400 102. |
| 2) | Periodicity of Publication | : | Monthly |
| 3) | Printers Name | : | Smt. Suhasini kirtikar |
| 4) | Address | : | Same as above |
| | Editors Name | : | Smt. Suhasini kirtikar |
| | Nationality | : | Indian |
| 5) | Address | : | Same as above |
| 6) | Name & Addres of Individuals who own the News Paper and Partners of Sharehold holding more than one Percent of Capital. | : | Board of Trustees Prabhu Tarun |

I Smt. Suhasini Kirtikar hereby declare that particulars given above are true to the best of my knowledge and belief.

**01-03-2017** **Suhasini Kirtikar**
Mumbai Signature of Publisher

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

**संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर** RNI NO. 14613/67